**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाविकास आघाडी, महायुतीच्या नेत्यांसह विदर्भात सर्वपक्षीय नेत्यांच्या प्रचार सभांचा धडाका.**
2. **बुटीबोरी एम.आय.डी.सी. चा चेहरा बदलून त्याला फाईव्ह स्टार एमआयडीसी करण्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांचं हिंगण्यातील प्रचारसभेत आश्वासन.**
3. **तेलंगणामध्ये काँग्रेसने दिलेल्या सहा गॅरंटी पैकी एकही पूर्ण केली नाही - भाजप नेते आणि केंद्रीय गृहराज्यमंत्री बंडी संजीव कुमार यांचा आरोप.**
4. **विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदार जनजागृतीसाठी प्रशासनाचे प्रयत्न.**
5. **आजपासून बुधवार दिनांक 20 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6.30 वाजेपर्यंत एक्झिट पोल घेण्यावर बंदी.**

---

**प्रचार सभा**

**राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर केला जाईल. राज्यात एकूण ४ हजार १३६ उमेदवार आहेत ज्यामध्ये ३ हजार ७७१ पुरूष, ३६३ महिला आणि अन्य २ उमेदवार आहेत. मतदान अवघ्या काही दिवसांवर आल्याने विदर्भात आज सर्वपक्षीय नेत्यांच्या प्रचार सभांचा धडाका बघायला मिळाला.**

---

**योगी आदित्यनाथ सभा पोहरादेवी**

**बंजारा समाजाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकासाच्या मुख्य प्रवाहात आणलं. मागील दहा वर्षात पोहरादेवीचा विकास झपाट्याने झाला असं प्रतिपादन उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री आणि भाजप नेते योगी आदित्यनाथ यांनी केलं. लहान मुले, महिला, शेतकरी आणि वृद्धांसाठी अनेक विकासाभिमुख योजना राबविण्यात आल्या असं देखील ते म्हणाले. आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने वाशीम जिल्ह्यातील भाजप आणि महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आदित्यनाथ यांची शंखनाद सभा वाशीम जिल्ह्यातील पोहरादेवी इथं पार पडली त्यावेळी ते बोलत होते.**

---------------------------------------------------

## देवेंद्र फडवणीस सभा मूर्तिजापूर

हरीश पिंपळे यांनी मुर्तीजापुर मतदार संघात अनेक विकास कामे केले आहेत. उमा बॅरेज प्रकल्प याची 707 कोटींची मान्यता मिळवून देण्याचे काम पिंपळे यांनी या मतदारसंघात केलं . जवळपास 18 हजार एकर क्षेत्राला पाणी देणारा आणि या क्षेत्राला सुजलाम सुफलाम करण्याचं काम पिंपळे यांनी केल असं मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी व्यक्त केलं. ते अकोल्यात मूर्तिजापूर येथे आयोजित प्रचार सभेत बोलत होते.

---------------------------------------------------

## यशोमती ठाकूर

विकास हेच आपले ध्येय असून मतदारसंघाच्या विकासास प्रथम प्राधान्य असल्याचं काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर म्हणाल्या. अमरावती जिल्हयातील नांदगाव पेठ परिसरात महा रॅली काढून यशोमती ठाकूर यांनी आज शक्ती प्रदर्शन केलं.

---------------------------------------------------

## रोहित पवार

पुढच्या बारा दिवसानंतर महाविकास आघाडीचे सरकार येईल. मुख्यमंत्री पदाबद्दल महाविकास आघाडीतील वरिष्ठ नेते निर्णय घेतील अशी स्पष्टोक्ती नेते रोहित पवार यांनी आज भंडारा इथं दिली. महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित सभेसाठी आले असताना ते बोलत होते.

दरम्यान, अपक्ष उमेदवार देखील गृह भेटी, प्रचार रॅली, समाज माध्यम आणि ध्वनिमुद्रित माध्यमांचा वापर करून आपला प्रचार करत असल्याचं आमच्या ठीकठिकाणच्या प्रतिनिधींनी कळवलं आहे.

---------------------------------------------------

## आजच्या प्रचार सभा नागपूर

प्रचाराचा शेवटचा आठवडा असल्यानं सकाळ पासून ते रात्री उशिरा पर्यंत सर्वच राजकीय पक्ष ऍक्शन मोड मध्ये आले आहे. नागपुरात रॅली, पदयात्रा, सभा यांचा जोर वाढला आहे.

---------------------------------------------------

## सुप्रिया सुळे हिंगणा सभा

महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर नागपूर जिल्हयातील बुटीबोरी एम. आय. डी.सी.चा चेहरा मोहरा बदलणार असून त्याला फाईव्ह स्टार एम.आय.डी.सी. करणार असल्याचा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला.

हिंगणा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश बंग यांच्या प्रचारार्थ, आज त्यांची जाहीर सभा नागपुरात झाली त्यावेळी त्या बोलत होत्या. याशिवाय त्यांनी महागाई, बेरोजगारी, महिला सुरक्षा यासह इतर मुद्द्यांना देखील स्पर्श केला. दरम्यान आज नागपुरात वार्ताहरांशी बोलताना होणाऱ्या निवडणुका या पारदर्शक पद्धतीने व्हाव्या अशी अपेक्षा सुळे यांनी व्यक्त केली. पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या राजकारणावर टीका केली. हा देश कोणत्याही एका व्यक्तीच्या किंवा अदृश्य शक्तीच्या मनमानीवर न चालता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या आधारावर चालतो असं त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची पदयात्रा आज सकाळी आठ वाजता जय भीम चौक कुंभार टोळी, इथून सुरू झाली आणि दूनेश्वर पेठे यांच्या कार्यालयात संपन्न झाली.

-----------------------------------------------

इतर प्रचार सभा

तर मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या सभेला पश्चिम नागपूरच्या सेलिब्रेशन हॉल गोरेवाडा इथं संध्याकाळी पाच वाजेपासून सुरुवात झाली आहे.

तर काँग्रेसच्या कन्हैया कुमार यांची प्रचार सभा आज दक्षिण पश्चिम नागपूर मध्ये आंबेडकर चौक, रामबाग इथं साडेपाच वाजता सुरु झाली आहे. दरम्यान वंचित बहुजन आघाडीच्या दक्षिण नागपूर विधानसभा क्षेत्राच्या उमेदवार सत्यभामा लोखंडे यांच्या प्रचारार्थ आज राजाबक्षा मैदान मेडिकल चौक इथं वंचित बहुजन आघाडी पक्षाचे प्रमुख एडवोकेट प्रकाश आंबेडकर यांची प्रचार सभा होत आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आज दक्षिण नागपुरातील साकोरे चौक इथं संध्याकाळी सात वाजता सभा घेणार असून पूर्व नागपुरात वाठोडा इथं रात्री आठ वाजता आणि रात्री नऊ वाजता उत्तर नागपूरातील गुलशन नगर इथं त्यांच्या प्रचार सभा होणार आहे.

-----------------------------------------------

गृहराज्यमंत्री बंडी संजीव कुमार (भाजप)/ विजय वडेट्टीवार

तेलंगणाचे मुख्यमंत्री महाराष्ट्रात येऊन साफ़ खोटे बोलतात. तेलंगणामध्ये काँग्रेसने दिलेल्या सहा गॅरंटी पैकी एकही पूर्ण केली नाहीत असा आरोप केंद्रीय गृहराज्यमंत्री बंडी संजीव कुमार यांनी नागपूर मध्ये भाजपा मीडिया कार्यालय इथं घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला. याप्रसंगी हिमाचलचे भाजप प्रदेशाध्यक्ष डॉ.राजीव बिंदल आणि कर्नाटक विधानसभेचे विरोधी पक्षनेते नारायणस्वामी उपस्थित

होते. बेरोजगारांना बेरोजगारी हप्ता म्हणून चार हजार रुपये असो की महिलांसाठीच्या योजना असो, एकही योजना तेलंगणात पूर्ण झाली नाही. MSPदिली नाही. प्रति क्विंटल धानपिकाला पाचशे रुपये अनुदान देखील दिलं नाही, असा आरोप कुमार यांनी केला. आता महाराष्ट्रात सुद्धा महाविकास आघाडी महिलांना तीन हजार रुपये, जातीआधारित जन गणना आदी भूलथापा देत असुन महाराष्ट्राची जनता त्यांना बळी पडणार नाही असं ते म्हणाले. दरम्यान काँग्रेसला बदनाम करण्यासाठी कर्नाटक आणि तेलंगाना मध्ये आम्ही लाडकी बहीण सारख्या योजना बंद केल्याची अफवा भाजप पसरवत आहे, उलट भाजपनेच मागील पाच महिन्यापासून मध्य प्रदेश मध्ये लाडक्या बहिणीचे पैसे दिलेले नाही, असा दावा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज पत्रकारांशी बोलताना केला. दहा वर्षांपूर्वी सोयाबीनला साडेचार हजार रुपये भाव मिळत होता. आज सोयाबीन 36०० रुपयांपर्यंत खाली उतरलं आहे. शेतकऱ्यांना उध्वस्त करणाऱ्या या सरकारला शेतकरी माफ करणार नाही. निवडणुकीच्या तोंडावर कर्जमाफी सारख्या भूलथापांना आता शेतकरी बळी पडणार नाही असा विश्वास वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.

----------------------------------------------

मतदार जनजागृती आवाहन

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, जिल्हा प्रशासन, विविध स्तरावर मतदानाबाबत जनजागृती करत आहे. नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी मतदारांना मतदानाचं कर्तव्य पार पाडण्याचं आवाहन केलं आहे.

*(होल्ड बाईट -विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी)*

*आपण सर्वांना माहिती आहे, कि विधानसभा सार्वत्रिक निवडणूकाच्या मतदानाचा दिवस येत आहे आणि २० तारखेला आपण सर्वांनी जाऊन मतदान करायचे आहे. आपल्याला जे आपल्या मतदान केंद्राच्या बद्दल माहिती आहे ते आपल्याला व्होटर हेल्प लाइन ऍप मधून मिळू शकतात. व्होटर हेल्पलाईनच्या वेबसाईट मधून मिळू शकतात आणि आपल्याकडे व्होटर इन्फॉर्मशन स्लिपपण बीएलओ देणार आहे. आणि आपण आपल्या मतदान केंद्राच्या बद्दल माहिती घेऊन ठेवावी आणि आपण आपल्या कुटुंबाच्या समवेत निश्चित जाऊन मतदान करावे यामुळे आमच्या लोकशाही अजून मजबूत होणार आहे.*

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदान साक्षरता जनजागृती अभियानाच्या अनुषंगाने मतदानाची टक्केवारी अधिकाअधिक वाढावी म्हणून भंडारा जिल्हा कृषी विभागाद्वारे रॅली काढून मतदारांना मतदान करण्याचं आवाहन करण्यात आलं. मानवी साखळी तयार करुन मतदानाचा अधिकार बजावण्यासाठी

मतदारांना प्रोत्साहित करण्यात आलं. याशिवाय नागपूरच्या गीतांजली टॉकीज चौक परिसरामध्ये शहरातील तृतीयपंथीयांनी मतदान जनजागृती केली. यावेळी उपस्थित सर्वांनी शंभर टक्के मतदानासाठी पुढाकार घेण्याची शपथ घेतली. तर शालेय विद्यार्थ्यांद्वारे शहरात विविध ठिकाणी मतदानाबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

-----------------------------------------------

एक्सिट पोल बंदी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार असल्यामुळे भारत निवडणूक आयोगाने लोकप्रतिनिधी अधिनियमातील तरतुदी अन्वये आज बुधवार दि. 13 नोव्हेंबर रोजी सकाळी 7 वाजतापासून बुधवार दिनांक 20 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6.30 वाजे दरम्यानच्या कालावधीसाठी एक्झिट पोल घेण्यावर बंदी घातली आहे. या बंदी आदेशानुसार प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया किंवा अन्य माध्यमाव्दारे एक्झिट पोल आयोजित करणे आणि प्रसिद्ध करणे तसच इतर कोणत्याही प्रकारे निवडणुकीशी संबंधित कोणत्याही एक्झिट पोलचा निकाल घेण्यास मनाई असेल, असं निवडणूक विभागानं कळविलं आहे.

-----------------------------------------------

सर्वोच्च न्यायालय

कोणत्याही आरोपीची मालमत्ता नष्ट करून शिक्षा देण्याचा अधिकार सरकारला नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. राज्य सरकारांकडून केल्या जाणाऱ्या बुलडोझर कारवाई विरोधात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीवेळी न्यायालयानं आज ही टिप्पणी केली. सरकारकडून अशा प्रकारचं मालमत्तेचं पाडकाम थांबवण्यासाठी न्यायालयानं मार्गदर्शक तत्वं जाहीर केली आहेत. पाडकाम करण्याआधी आरोपीला पूर्वसूचना द्यावी असं न्यायालयानं म्हटलं आहे. या नोटीशीवर आरोपीकडून पंधरा दिवसांच्या आत किंवा स्थानिक प्रशासनानं घालून दिलेल्या कालमर्यादेत उत्तर देणं अपेक्षित आहे. या पाडकामाचं चित्रिकरण करणं, कारवाईचं दस्तऐवजीकरण करणं, जिल्हाधिकाऱ्यांना याचा अहवाल पाठवणं आणि डिजिटल पोर्टलवर कारवाईची माहिती प्रकाशित करणं अनिवार्य आहे, असंही न्यायालयानं म्हटलं आहे. दरम्यान, कायदेशीर प्रक्रियेशिवाय अशी कारवाई केल्यास ती सरकारची मनमानी समजली जाईल, असं न्यायालयानं म्हटलं आहे. ‘कायद्याचं राज्य’ या संकल्पनेची आठवण करून देत न्यायालयाने सांगितलं की अपराध सिद्ध होईपर्यंत आरोपीला दोषी मानता येणार नाही, तसंच अशी शिक्षा देणं हे न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळाच्या अधिकारांच्या विभाजनाचं उल्लंघन ठरेलं.

-----------------------------------------------

**आढावा विधानसभा मतदारसंघांचा**

**विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या** Youtube **वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अहिल्यानगर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.**

-----------------------------------------------